# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 30.11.2024** **वार – शनिवार**

---

**दीक्षान्त संचलन सोहळा**

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या 147 व्यां तुकडीचा दीक्षान्त संचलन सोहळा आज पुण्यात वायु दल प्रमुख एयर चिफ मार्शल अमर प्रीत सिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत खेत्रपाल मैदानावर दिमाखात पार पडला. सैन्य दलाच्या कारकीर्दीत कठीण निर्णय घेण्याची वेळ तुमच्यावर येईल त्यावेळी तुम्ही तुमच्या विचारांशी एकनिष्ठ राहा म्हणजे सोप्या मार्गाचा अवलंब न करता आव्हानात्मक मार्गाचा स्वीकार कराल असा कानमंत्र त्यांनी छात्रांना याप्रसंगी दिला. सिंग यांच्या हस्ते राष्ट्रपती सुवर्ण पदक अंकित चौधरी, रौप्य पदक युवराजसिंग चौहान, कास्य पदक जोधा थोंगजय मयो तर गोल्फ स्क्वाड्रनला चीफ ऑफ बॅनर प्रदान करून गौरवण्यात आलं. यावेळी सुखोई विमानांनी आकाशातून भरारी घेतली. 147 व्या तुकडीतील 357 छात्र सैन्य दलात दाखल झाले. यामध्ये 19 मित्र देशांच्या छात्रांचा समावेश होता.

**अवयव दान**

पुण्यातील सदर्न कमांड हॉस्पीटलमध्ये 33 वर्षीय मेंदूमृत नौसैनिकाचे पाच अवयव अन्य गरजू रुग्णांना बसविण्यात आले. यामध्ये हृदय, दोन्ही डोळे, यकृत आणि दोन्ही मूत्रपिंडांचा समावेश होता. या सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर असून त्यांना नवजीवन मिळालं आहे. कमांड हॉस्पिटलचे मेजर जनरल बी.नंबियार, यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक समन्वयक, आयसीयू कर्मचारी, बहु-विशेषोपचार डॉक्टर आणि परिचारिका यांनी विशेष भूमिका पार पाडली तर लष्कर तसंच राज्य पोलिसांच्या मदतीनं मुंबईपर्यंत ग्रीन कॉरिडॉरची सुविधा देण्यात आली.

**ससून कार्यशाळा**

पुण्यातील ससून सर्वोपचार रूग्णालय आणि बालरोग विभागाच्या वतीनं दोन दिवसीय बेसिक लाईफ सपोर्ट आणि ॲडव्हान्स लाईफ सपोर्ट कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत राज्यातून 40 डॉक्टरांनी सहभाग नोंदवला. ससूनमध्ये प्रशिक्षण केंद्र झाल्यापासून या विभागानें 160 जणांना ॲडव्हान्स लाईफ सपोर्ट आणि 350 जणांना बेसिक लाईफ सपोर्ट प्रशिक्षण दिलं आहे. तसंच

सुरक्षितता रक्षक, वाहनचालक, अनाथालयातील कर्मचारी आणि शाळेतील शिक्षकांसह 450 नागरिकांसाठी जागृती कार्यक्रमांचं आयोजनही केलं आहे.

**दिव्यांग**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत दिव्यांग कल्याणकारी योजनेअंतर्गत येत्या मंगळवारी जागतिक दिव्यांग दिन" साजरा करण्यात येणार आहे.

तसंच दिव्यांगांसाटी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सामाजिक संस्था, संघटना तसंच विशेष प्राविण्य प्राप्त दिव्यांग नागरीक, विद्यार्थी यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

दिव्यांगांसाठी असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती आणि मार्गदर्शन सत्रही यानिमित्त आयोजित करण्यात आली आहेत.

**वाहतूक**

पुणे शहरातील सिग्नल यंत्रणेची जबाबदारी पुढील पाच वर्षे स्वीकारण्याची तयारी 'स्मार्ट सिटी कंपनी'च्या प्रशासनानं दाखविली आहे. पुणे महापालिकेचे  अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी ही माहिती दिली.

**पुणे शहराचे पुतळे**

पुणे शहराच्या विविध भागांतील महापुरुषांच्या पुतळ्यांची प्राथमिक तपासणी महापालिकेनं केली आहे. त्यामध्ये बहुतांश पुतळे सुस्थितीत आहेत. काही पुतळ्यांना पन्नास वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाला आहे, त्यामुळे महापालिकेच्या भवन विभागाकडून 25 हून अधिक पुतळ्यांची अल्ट्रासॉनिक टोमोग्राफीक टेस्ट या अद्ययावत तंत्रज्ञानाच्या सहाय्यानं तपासणी केली जाणार आहे अशी माहिती पुणे महापालिकेच्या भवन विभागाचे प्रमुख युवराज देशमुख यांनी दिली.

**सर्पदंश**

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना राज्य सार्वजनिक आरोग्य कायदा किंवा इतर लागू कायद्याच्या संबंधित तरतुदींनुसार सर्पदंशाची प्रकरणं आणि त्यामुळं होणारे मृत्यू 'सूचित करण्यायोग्य रोग' म्हणून गणण्यास सांगितलं आहे. सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे प्रधान सचिव आणि अतिरिक्त मुख्य आरोग्य सचिवांना लिहिलेल्या पत्रात केंद्रीय आरोग्य सचिव पुण्य सलिला श्रीवास्तव यांनी सर्पदंश ही सार्वजनिक आरोग्याची महत्त्वपूर्ण चिंता असल्याचं सांगितलं. सूचित करण्यायोग्य रोग म्हणजे एक आजार, ज्याचं निदान झाल्यावर सार्वजनिक आरोग्य अधिकाऱ्यांना कळवणं आवश्यक असतं.

**टेबल टेनिस**

महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघटनेच्या वतीनं राज्य अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा दोन डिसेंबरपासून पुण्यात आयोजित केली जाणार आहे. या स्पर्धेसाठी पुणे जिल्ह्याचा विविध वयोगटांचा संघ जाहीर झाला आहे. नील मुळ्ये याच्याकडे पुरुष आणि 19 वर्षाखालील मुले या गटाचे, तर 17 वर्षाखालील मुलांच्या संघाचे कर्णधारपद ईशान खांडेकर याच्याकडं सोपवण्यात आलं आहे. समृद्धी कुलकर्णी महिला संघाचं, आणि 19 आणि 17 वर्षाखालील मुलींच्या संघाचं नेतृत्व जान्हवी फणसे आणि नैशा रेवसकर करणार आहेत. ही स्पर्धा 7 डिसेंबरपर्यंत महाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात होणार आहे.

**पुणे पुस्तक जत्रा**

पश्चिम भारतातील सर्वात मोठं ग्रंथ आणि शिक्षण प्रदर्शन "पुणे पुस्तक जत्रा" 22 वं प्रदर्शन बुधवार 4 ते रविवार 8 डिसेंबरदरम्यान गणेश कला क्रीडा मंच इथं भरविण्यात येत आहे. हे प्रदर्शन "ज्ञानसंपन्न समाजाच्या दिशेने" या ब्रीदवाक्यावर आधारित आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**